RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




सोमवार, ०७ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : १०२ | दैनिक | किंमत : ₹५/-

Monday, 07 April 2025 | Year : 5 | Issue : 102 | Daily | Rate: Rs. 5/-

# पाचवेळा लोकसभेचे कामकाज लांबले

## गोध्रा हत्याकांडवरील चर्चा

**नवी दिल्ली :** यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एक विक्रम रचण्यात आला आहे. वक्फ दुरुस्ती विधेयकावरील चर्चेत यंदा लोकसभेचे कामकाज विक्रमी वेळेत चालले. जवळपास 15 तास 41 मिनिटे ही चर्चा रंगली. सकाळी 11 वाजता सुरू झालेले सभागृह पहाटे 2.40 मिनिटांनी स्थगित करण्यात आले. यामध्ये वक्फ दुरुस्ती विधेयक चर्चा आणि मणिपूरमधील राष्ट्रपती राजवटीवर चर्चा झाली. तर, वक्फ विधेयकावर सर्वाधिक 12 तासांहून अधिक वेळ चर्चा रंगली होती.

3 एप्रिल गुरुवारी दुपारी 1 वाजता राज्यसभेतही वक्फ विधेयकावर चर्चा झाली. ही चर्चाही 12 तासांहून अधिक काळ चालली. संसदीय नोंदींनुसार ही राज्यसभेची दुसरी सर्वात जास्त वेळची बैठक होती, असे पीटीआयने म्हटले आहे. राज्यसभेत 17 सप्टेंबर 1981 मध्ये सर्वाधिक काळ चर्चा चालली होती. हे सभागृह दुसऱ्या दिवशी पहाटे 4.43 संपले. अत्यावश्यक सेवा देखभाल विधेयक, 1981 च्या विचारासाठी आणि मंजूरीसाठी ही चर्चा झाली होती. त्यानंतर, 8 मे 1986 रोजी मुस्लिम महिला (घटस्फोटावरील हक्कांचे संरक्षण) विधेयक, 1986 च्या विचारासाठी आणि मंजूरीसाठी दुसऱ्या दिवशी पहाटे 1ः52 वाजेपर्यंत सभागृह चालले होते.

पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्चने संकलित केलेल्या डेटावरून असे दिसून येते की लोकसभेचे कामकाज क्वचितच जास्त



काळ चालले असेल. गेल्या 50 वर्षांच्या इतिहासात केवळ 2002 च्या गुजरातच्या हिंसाचारावर सर्वाधिक काळ सभागृह चालले होते. तर, अत्यावश्यक सेवा देखभाल विधेयकावर चर्चा करण्यासाठी आणि दोनदा रेल्वे अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी लोकसभेचे कामकाज चालले होते.

**1997 : स्वातंत्र्याच्या 50 व्या वर्षासाठी विशेष बैठक**

30 ऑगस्ट 1997 रोजी संसदेचे कामकाज सकाळी 11 वाजून 8 मिनिटांनी सुरू झाले होते. हे कामकाज दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजेच 31 ऑगस्ट रोजी 8 वाजून 24 मिनिटांनी संपले. जवळपास 20 तास 8 मिनिटे सभागृह चालले होते. भारताला स्वातंत्र्य मिळून 50 वर्षे झाल्याच्या निमित्ताने हे विशेष अधिवेशन भरवण्यात आले हो. त्यावेळी इंद्रकुमार गुजराल 13 पक्षांच्या संयुक्त आघाडी सरकारचे नेतृत्व करत होते.

लोकसभेतील तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांनी 'लोकशाही आणि लोकशाही संस्थांची स्थिती, आर्थिक परिस्थिती, पायाभूत सुविधांची स्थिती, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगिरी व क्षमता आणि देशातील मानवी विकासाची स्थिती' या विषयावर सादर केलेल्या एकाच प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी सभागृहाचे विशेष अधिवेशन बोलावण्याची ही पहिलीच वेळ होती.

*1993: रेल्वे अर्थसंकल्प, 1998: रेल्वे अर्थसंकल्प, 2002: गोध्रा कांडावर चर्चा*

*2002 साली गोध्रा हत्याकांडामुळे देश हादरला होता. 1981: अत्यावश्यक सेवा देखभाल विधेयक*

अत्यावश्यक सेवा देखभाल विधेयकासाठी 15 सप्टेंबर 1981 मध्ये संसदेत चर्चा झाली होती. ही चर्चा दुसऱ्या दिवशी सकाळी 16 सप्टेंबर रोजी सकाळी 3 वाजून 58 मिनिटांनी संपली. म्हणजेच 16 तास 58 मिनिटे ही चर्चा चालली होती. आणीबाणीच्या काळात त्यांच्या विरोधात एकत्र आलेल्या जनता पक्षाचे विघटन झाल्यानंतर इंदिरा गांधी पुन्हा सत्तेत आल्या होत्या. अत्यावश्यक सेवा देखभाल कायद्याने केंद्राला काही व्यवसायांमध्ये संप प्रतिबंधित करण्याचा अधिकार दिला होता. या कायद्यानुसार बेकायदा संप सुरू करणारी किंवा अशा कोणत्याही संपात भाग घेणारी किंवा संपाला 'प्रवृत्त करणारी किंवा चिथावणी देणारी' कोणतीही व्यक्ती 'शिस्तभंगाची कारवाईस जबाबदार असेल' असे कायद्यात म्हटले आहे

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी श्रीलंकेत बोधीवृक्षाला शरण ...

**नवी दिल्ली :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी श्रीलंकेच्या अधिकृत दौऱ्यावर गेले आहेत. श्रीलंकेत दाखल झाल्यानंतर त्यांनी रामनवमीच्या निमित्ताने अनुराधापुरा या ऐतिहासिक शहराला भेट दिली आणि जय श्रीमहा बोधी मंदिरात प्रार्थना केली.



यावेळी प्रधानमंत्री मोदींना श्रीलंकेच्या हवाई दलाकडून गार्ड ऑफ ऑनरही देण्यात आला. प्रधानमंत्री मोदींचे अनुराधापुरात आगमन झाल्यानंतर राष्ट्रपती दिसानायके यांनी त्यांचे स्वागत केले. प्रधानमंत्रींनी या भेटीचे क्षण सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

या पवित्र ठिकाणी त्यांच्यासोबत श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायकेदेखीलउपस्थित होते. मंदिराच्या मुख्य पुजाऱ्यांनी प्रधानमंत्री मोदींचे रक्षासूत्र बांधून स्वागत केले. हे मंदिर भारत आणि श्रीलंका यांच्यातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संबंधांचे प्रतीक मानले जाते. विशेष म्हणजे, जय श्री महाबोधी मंदिरात असलेले बोधीवृक्ष सुमारे 2300 वर्षे जुने आहे. असे मानले जाते की, सम्राट अशोकांची मुलगी थेरी संघमित्रा हिने हे झाड भारतातून श्रीलंकेत आणले होते. ज्या बोधीवृक्षाखाली गौतम बुद्धांना ज्ञान प्राप्त झाले, त्याच बोधीवृक्षाच्या दक्षिणेकडील फांदीपासून या वनस्पतीची उत्पत्ती झाली आहे. हे झाड श्रीलंकेचा राजा देवनमपिया टिस्सा यांनी इ.पू. 288 मध्ये त्यांच्या शाही बागेत लावले होते.

जय श्री महाबोधी वृक्षाला बौद्ध धर्मात अत्यंत पूजनीय मानले जाते. हा बुद्धाचा जिवंत आणि अस्सल दुवा मानला जातो. शतकानुशतके बौद्ध भक्त या झाडाखाली येऊन प्रार्थना करतात. असे मानले जाते की या झाडाचे दर्शन आणि पूजा केल्याने मुले जन्माला येतात, चांगली कापणी होते आणि मनोकामना पूर्ण होतात. मोदी आणि दिसानायके यांनी अनुराधापुरामध्ये रेल्वे कनेक्टिव्हिटीशी संबंधित दोन प्रकल्पांचे संयुक्तपणे उद्घाटनही केले. यामध्ये महो अनुराधापुरा रेल्वे विभागात महो ओमंथाई लाईनचे अपग्रेड आणि आधुनिक सिग्नलिंग सिस्टीमचा समावेश आहे. हे प्रकल्प भारताच्या मदतीने पूर्ण झाले आहेत.

## अवैध विवाहातून जन्माला आलेल्या मुलालाही मिळणार वडिलांची संपत्ती : उच्च न्यायालय



**ओडिशा :** आपल्या सभोवताली अनेक वेळा संपत्तीवरून होणारे कौटुंबिक वाद समोर येत असतात. अशा घटना अनेक वेळा न्यायालयापर्यंतही पोहोचतात. यात अनेक वेळा बहुविवाहाचे प्रकरण समोर येते. अशाच एका प्रकरणात ओडिशा उच्च न्यायालयाने एक महत्वाचा निर्णय दिला आहे. 'जर एखाद्याचा दुसरा विवाह अवैध घोषित केला असला तरीही, त्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलांना पित्याच्या संपत्तीत संपूर्ण अधिकार मिळेल. यात केवळ स्वतः अर्जित केलेल्या मालमत्तेचाच नाही, तर वडिलोपार्जित मालमत्तेचाही समावेश असेल,' असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने हा निर्णय हिंदू विवाह कायदा आणि हिंदू उत्तराधिकार कायद्यातील तरतुदीनुसार दिला आहे. खरे तर हे प्रकरण एका 80 वर्षांच्या महिलेच्या याचिकेशीसंबंधित आहे. या वृद्ध महिलेने आपल्या दिवंगत पतीच्या, दुसऱ्या पत्नीच्या मुलांना मालमत्तेपासून दूर ठेवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, केवळ आपणच मृत व्यक्तीची कायदेशीर पत्नी आहोत, यामुळे केवळ आपल्याच मुलांना मालमत्तेचा अधिकार मिळावा, असा दावा या महिलेने केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने या महिलेची याचिका फेटाळून लावली.

## ईडीची 'एल-2 एम्पुरान'च्या निर्मात्याच्या ठिकाणांवर छापेमारी!

**नवी दिल्ली :** प्रवर्तन निदेशालय (ईडी)ने शुक्रवारी आणि शनिवारी श्री गोपालन चिट अँड फायनान्सेस कंपनी लिमिटेड आणि त्याचे अध्यक्ष गोकूल गोपालन यांच्याशी संबंधित परिसरांमध्ये छापेमारी केली. ही छापेमारी एक हजार कोटी रुपयांच्या परकीय चलन व्यवस्थापन कायदा, 1999 च्या उलंघनाच्या प्रकरणात केली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार शुक्रवारी सकाळी तमिळनाडू, केरळ आणि कर्नाटक येथे छापेमारीला सुरूवात झाली. अनिवासी भारतीयांबरोबर व्यावहारांदरम्यान नियमांचे उल्लंघन झाल्याची आणि अनाधिकृत देवाणघेवान झाल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. दरम्यान शनिवारी ईडीने या छापेमारीत जप्त केलेल्या पैशांचा फोटो सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. याबरोबरच ईडीच्या अधिकृत अकाउंटवरून या कारवाईबद्दल माहिती देण्यात आली आहे. 'ईडी, कोची झोनल ऑफिसने 4 एप्रिल 2025 आणि 5 एप्रिल 2025 रोजी फेमा, 1999 कायद्या अंतर्गत केरळमधील कोझिकोड येथील एका ठिकाणी आणि तमिळनाडूमधील चेन्नई येथील दोन ठिकाणी श्री गोकुलम चिट्स



अँड फायनान्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेडच्या निवासी आणि व्यावसायिक परिसरात शोध मोहीम राबवली. या छाप्यांमध्ये 1.50 कोटी रुपये रोख आणि फेमा,1999 च्या उल्लंघनासंबंधी कागदपत्रे जप्त करण्यात आली,' असे ईडीने म्हटले आहे. ईडीकडून चेन्नई येथील या फर्मविरोधात विविध राज्यातील पोलीसांकडून दाखल करण्यात आलेल्या अनेक फसवणुकीच्या प्रकरणाची चौकशी केली जात आहे. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या वर्षी जानेवारीमध्ये मलप्पुरम जिल्ह्यात फर्मच्या विरोधात अनेक एफआयआर दाखल केले गेले होते. भारतीय दंड संहितेचे वेगवेगळ्या कलमांतर्गत आणि चिट फंड कायद्याच्या कलमांतर्गत दाखल प्रकरणे पीएमएलए अंतर्गत अनुसूचित गुन्हा आहेत.

## डोनाल्ड ट्रम्प अन् एलॉन मस्क यांच्या विरोधात हजारो अमेरिकन नागरिक रस्त्यावर



**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक निर्णयांचा धडाका लावला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या काही मोठ्या निर्णयांमध्ये प्रामुख्याने बेकायदेशीर स्थलांतरितांचा मुद्दा असेल, नवीन टॅरिफ धोरण (आयात शुल्क) असेल किंवा अमेरिकेतील कर्मचारी कपातीचा निर्णय असेल अशा निर्णयांचा समावेश आहे. ट्रम्प यांच्या निर्णयाचा जगभरातील अनेक देशांना फटका बसला आहे. दरम्यान, आता डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सल्लागार एलॉन मस्क यांच्या विरोधात अमेरिकेत मोठ्या प्रमाणात नागरिक निदर्शने करत असल्याची माहिती समोर आली आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्या धोरणांच्या विरोधात अमेरिकन नागरिक 'हॅन्ड्स ऑफ' असे पोस्टर्स हातात घेऊन रस्त्यावर उतरले आहेत. सरकारी नोकऱ्यांमध्ये कपातीचा निर्णय, देशाची अर्थव्यवस्था, मानवाधिकार आणि टॅरिफ धोरण अशा मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन नागरिकांनी शनिवारी मोठ्या प्रमाणात मोर्चे काढले आहेत. काही दिवसांपूर्वी युनायटेड स्टेट्समधील सरकारी जमिनींचे व्यवस्थापन आणि माजी सैनिकांची काळजी घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये मोठी कपात करण्यात आली.

## गोखले राज्यशास्त्र संस्थेतील एक कोटी 42 लाखांचा निधी नियमबाह्य...

**पुणे :** गोखले राज्यशास्त्र अर्थशास्त्र संस्थेतील एक कोटी 42 लाख रुपयांचा निधी नियमबाह्य पद्धतीने वळविल्याचा आरोपावरून सर्व्हंट्स ऑफ इंडियाचे सचिव मिलिंद देशमुख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी मिलिंद देशमुख यांना अटक करण्यात आली. त्यांना तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती डेक्कन पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांनी दिली. याबाबत डॉ. विशाल भीमराव गायकवाड (वय 39, रा. रामनगर, वारजे) यांनी डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डॉ. गायकवाड हे 2022 पासून गोखले राज्यशास्त्र संस्थेत संशोधन समन्वयक (रिसर्च को ऑर्डिनेटर) म्हणून काम पाहत होते. सध्या ते संस्थेत 'ऑफिशिएटिंग डेप्युटी रजिस्ट्रार' आहेत

## विद्यार्थ्यांसाठी थंड पेयाचा खर्च कोण करणार ? शिक्षकांचा सवाल

**अमरावती :** उन्हाळा वाढल्याने हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार वेळेचे नियोजन करावे. वर्ग खोल्या थंड ठेवा, प्रथमोपचार आणि पेयजलाची सोय करा, पोषण आहारात मुलांना सरबत, ताक, ओआरएसचे पाकीट द्या, आदी सूचना महसूल मंत्रालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने सर्व शाळांना केल्या आहेत. मात्र, यासाठी पैसा कोठून आणायचा, असा प्रश्न शाळेच्या मुख्याध्यापकांसमोर आहे.



त्यामुळे नव्या आदेशानुसार गोष्टींसाठी पैसा आणायचा कोठून, हा प्रश्न आहे. उन्हाचा तडाखा लक्षात घेता पूर्वी प्रमाणे एप्रिलच्या सुरुवातीच्या काळात परीक्षा आटोपणे चांगले होते. मात्र, शासनाने पहिली ते नववी पर्यंतच्या परीक्षा पुढे ढकलल्या, या परीक्षा 25 एप्रिलपर्यंत चालणार आहेत. यानंतर पाच दिवसांत पेपर तपासून 1 मे रोजी निकालही द्यायचा आहे. हे कसे साध्य होणार आहे, याचा विचार सरकारने केला नाही. आता हा आदेश थोपवून सरकारने शाळांना खर्चात पाडले आहे. शासनाने दिलेले आदेश योग्य असले, तरी या सर्व गोष्टी पुरवण्यासाठी पैसा कोठून आणायचा, हा प्रश्न आहे. साहित्य खरेदीसाठी लहान शाळांना 5000 व मोठ्या शाळांना 12,500 रुपये शाळा संयुक्त अनुदान मिळते, जे यावर्षी मिळाले नाही.

पोषण आहाराचे किंवा शाळांना साहित्य खरेदीसाठी मिळणारे अनुदान वेळेत मिळत नसताना आता या गोष्टींच्या खरेदीसाठी पैसा कोठून आणायचा, असा सवाल शिक्षक संघटनांकडून विचारला जात आहे. शाळेत मिळणाऱ्या पोषण आहाराचे अनुदान वेळेवर मिळत नाही. या वर्षीचे अनुदान अद्याप शाळांकडे आले नाही. बऱ्याच शाळांमध्ये तांदूळ नव्हते, जे दोन दिवसांपूर्वी देण्यात आले. अनुदान वेळेत न मिळाल्याने हा खर्च शिक्षक, मुख्याध्यापकांना करावा लागतो. एखाद्या शाळेत 25 ते 30 मुले असतील, त्यांना जमेल; पण शंभर, दोनशे, अडीचशे विद्यार्थी असलेल्या शाळांना एवढा खर्च कसा करावा, हा प्रश्न आहे.

## गुजरातमधील न्यायालयाच्या निर्णयाला नागपूर खंडपीठाकडून स्थगिती



**नागपूर :** नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश गुजरातमधील वडोदरा येथील कौटुंबिक न्यायालयाने दिले होते. एका कौटुंबिक प्रकरणात वडोदरा न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन न केल्यामुळे पोद्दार यांच्याविरोधात हा आदेश देण्यात आला होता. मात्र गुजरातमधील वडोदरा कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयाला नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली. गुजरातमधील न्यायालयाच्या निर्णयाविरोधात नागपूरमधील न्यायालयाला निर्णय देता येते का? याबाबत नियमांची चाचपणी केल्यावर नागपूर खंडपीठाने हा निर्णय दिला. वडोदराच्या कौटुंबिक न्यायालयाने 28 मार्च 2025 रोजी दिलेल्या आदेशाला पोलीस अधीक्षकयांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. न्यायालयाने आदेशात म्हटले होते की 2018 पासून, उमरेड पोलिस ठाण्याने संबंधित व्यक्ती, जितन मेसरला त्याच्या पत्नीच्या देखभालीसाठी जारी केलेले वॉरंट दिले नाही किंवा त्याच्याकडून कोणतीही वसुली केली नाही. या आधारावर, पोलीस अधीक्षक. आणि पोलीस निरीक्षक उमरेड यांच्यावर भारतीय दंड संहिताच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले.

# टार्गेट पूर्ण केले नाही म्हणून ...

**कोची :** केरळमधील कोची शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पेरुम्बावूर येथील एका खाजगी कंपनीत कर्मचाऱ्याला एवढी वाईट वागणूक देण्यात आली आहे की, कुणाचाही संताप उडेल. या कर्मचाऱ्याच्या गळ्यात कुत्र्याचा पट्टा बांधून त्याला कार्यालयात गुडघ्यांवर फिरवण्यात आले. त्याला कुत्र्याच्या भांड्यात पाणी देऊन ते कुत्र्याप्रमाणेच पिण्यास भाग पाडले गेले. एवढेच नाही, तर त्याला त्याचे कपडे काढून मारहाणही करण्यात आली. हे सर्व संबंधित कर्मचाऱ्याच्या खराब परफॉर्मेंस मुळे, शिक्षा म्हणून करण्यात आले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हयरल झाल्यानंतर खळबळ उडाली आहे.

घरोघरी जाऊन वस्तू विकते कंपनी -

एर्नाकुलम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना घटना घडलेल्या घराचा पत्ता मिळाला आहे. हे घर पेरुम्बावूरमधील अराक्कापदी येथे आहे. अधिकाऱ्यांच्या मते, ही एक सेल्स कंपनी आहे. जी केरळमध्ये घरोघरी जाऊन वस्तूंची विक्री करते. सुरुवातीच्या तपासात दिसून आले आहे की, संबंधित कंपनीत गेल्या तीन महिन्यांपासून एकही पुरुष कर्मचारी नाही. तेथे केवळ महिला कर्मचारीच कार्यरत आहेत. अधिकारी या सर्व महिला कर्मचाऱ्यांशी बोलत आहेत.



> केरळमध्ये कामगार कायद्यांची अंमलबजावणी अतिशय काटेकोरणे केली जाते. कोणत्याही परिस्थितीत कामगारांचा छळ सहन केला जाणार नाही. अहवालाच्या आधारे पुढील कारवाई केली जाईल.
>
> \- व्ही. शिवनकुट्टी (केरळचे कामगार मंत्री)

**कर्मचाऱ्यांनी उघड केले सत्य -**

काही कर्मचाऱ्यांनी एका टीव्ही चॅनेलला दिलेल्या माहितीत म्हटले आहे की, जे कर्मचारी टर्गेट साध्य करण्यात अयशस्वी होतात, त्यांना कंपनी व्यवस्थापनाकडून अशा प्रकारे शिक्षा केली जाते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना कलूरमध्ये कार्यरत असलेल्या एका खाजगी मार्केटिंग कंपनीशी संबंधित आहे आणि हा गुन्हा जवळच्या पेरुम्बावूरमध्ये घडल्याचे वृत्त आहे. उच्च न्यायालयाचे वकील कुलथूर जयसिंग यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून राज्य मानवाधिकार आयोगाने या घटनेबाबत गुन्हा दाखल केला आहे

**खराब परफॉर्मेंस मुळे शिक्षा ...**

कर्मचाऱ्याचा परफॉर्मेंस खराब होता म्हणून त्याला शिक्षा देण्यात आल्याचे बोलले जात आहे. व्हिडिओमध्ये दिसत आहे की, कर्मचाऱ्याला एखाद्या कुत्र्याप्रमाणे गुडघ्यावर चालवले गेले. त्याल काही कॉइन्स जमिनीवर टाकून ते चाटण्यास सांगण्यात आले. तसेच, त्याला कुत्र्याच्या भांड्यात पाणी भरून कुत्र्यासारखेच प्यायलाही भाग पाडले गेले.

**कंपनीविरुद्ध चौकशी सुरु**

**या घटनेसंदर्भात कामगार अधिकाऱ्यांनी संबंधित व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या एका तरुणाची चौकशी केली. यात, हा व्हिडिओ एका कर्मचाऱ्याने बनवला आहे. तो कर्मचारी व्यसनी होता आणि त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले असल्याचे, त्या तरुणाने सांगितले. पोलिस अधिकाऱ्यांनी कंपनीविरुद्ध चौकशी सुरू केली आहे. या कंपनीविरुद्ध यापूर्वीही तक्रार आली होती. पोलिसांनी पलारीवट्टोम येथील कंपनीच्या कार्यालयाची तपासणी केली.**

बहुजन सौरभ

वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!



११ एप्रिल राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले,
१४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
९ एप्रिल बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे



यांच्या संयुक्त जयंतीप्रित्यर्थ

आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

जाहिरात दरपत्रक

| | | |
|---|---|---|
| पान एक | - पूर्ण पान | - ६० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - ३० हजार रूपये |
| | - पाव पान | - १५ हजार रूपये |
| अंतिम पान | - पूर्ण पान | - ५० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - २५ हजार रूपये |

शुभेच्छा जाहिरात २००० रु. पासून

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::

१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ,
वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे,
तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४
मेल -bahujansaurabh@gmail.com
संपर्क - 7020149291, 9422860648, 9421588901

“ ज्ञानाची खरी परीक्षा त्याचा योग्य वापर करण्यात आहे. ”



# जगातील महान विद्यार्थी डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*जागतिक विद्वान, महान कायदेपंडित, भारतीय घटनेचे एकमेव शिल्पकार, महान अर्थशास्त्रज्ञ महान प्राध्यापक महान बॅरिस्टर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जगातील महान विद्यार्थी होते. ते जगातील सर्व विद्यार्थ्यांचे आदर्श आहेत. तथागत बुद्ध, गुरू कबीर, महात्मा जोतिबा फुले हे बाबासाहेबांचे गुरू होते.*

डॉ. बाबासाहेब 6 वर्षांचे झाल्यावर त्यांना साताऱ्याच्या कॅम्प स्कूल मध्ये नोव्हेंबर 1896 ला मराठी शाळेत घातले. त्याच शाळेत आनंदराव शिकत होते. परंतु त्यांना लहानपणापासून जातियवाद सहन करावा लागला. बाबासाहेबांच्या माता भिमाईचे बाबासाहेब लहान असतानाच सातारा येथे 1896 मध्ये निधन झाले. त्यांची समाधी सातारा येथे आहे. त्यांची आत्या मिराबाईने त्यांना खूप जिव लावला. त्यांचे आडनाव सकपाळ होते. लहानपणी जातियवादामुळे त्यांची कटिंग करून देत नव्हते. बाबासाहेब व त्यांचा भाऊ आनंदराव यांना वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घ्यावे लागले. त्यांना शाळेत पाणीसुद्धा देत नव्हते. त्यांनी पाणी पिले तर त्यांना मारले होते. साताऱ्याच्या शाळेत त्यांना प्रवेश देण्यास जातियवादाचा अडथळा होता. त्यांचे वडिल रामजीबाबांनी बाबासाहेबांना शाळेच्या प्रवेशासाठी खूप प्रयत्न केले. कॅम्प स्कूल मधून बाबासाहेबांनी मराठीतून शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर सातारा हायस्कूल मध्ये 7 नोव्हेंबर 1900 ला त्यांना इंग्रजीच्या पहिल्या वर्गात घालण्यात आले. 1951 ला त्यांचे शाळेचे नामकरण प्रतापसिंह हायस्कूल असे झाले. पूर्वीचे नांव गव्हर्नमेंट हायस्कूल होते. त्यांना हायस्कूलमध्ये पेंडसे नावाचे शिक्षक होते. त्यानंतर त्यांची साताऱ्याची सरकारी नोकरी संपली. त्यानंतर ते 1904 ला मुंबईला आले. 1905 ला बाबासाहेबांचे रमाईशी लग्न झाले. रामजीबाबा घरी भिमरावांचा खूप अभ्यास करून घेत असत. त्यांनी भिमरवांना हावर्डच्या इंग्रजी पुस्तकांचा आणि तर्खडकरांच्या इंग्रजी पाठमालेचा अभ्यास शिकविला. इंग्रजी भाषा शिकविली. तसेच रामजींनी गणितसुद्धा भिमरावांना शिकविले. भारतातील वर्णभेद व जातीभेदामुळे मागास व बहुजन समाजाचा व महिलांचा खूप छळ झाला. पेशवाईत तर फारच जातीयवाद होता. रामजीबाबांमुळे घरातील सर्वांना कबीराचे दोहे व तुकारामांच्या गाथा पाठ कराव्या लागत. लहानपणी त्यांना क्रिकेट खेळतांना जातीयवाद सहन करावा लागला. जीजाबाई त्यांच्या सावत्र आई होत्या. बाबासाहेबांना संस्कृत शिकू दिले नाही. पुढे त्यांनी स्वतः नंतर संस्कृत शिकली. त्यानंतर बाबासाहेबांचे वडिल रामजीबाबा मुंबईला आले. तेथे एलफिन्स्टन हायस्कूलमध्ये भिमरावांचे नाव टाकले. परंतु त्यांना शाळेत प्रवेश द्यावा कि नाही यावर शाळेने तीन दिवस लावले. डॉ.बाबासाहेब लहानपणापासून खूपच बुद्धिमान होते. एलफिन्स्टनमध्ये एक उच्चवर्णिय शिक्षक त्यांना नेहमी जातीयवादी दृष्टीने पाहत असे. बाबासाहेबांना ते शिक्षक एकदा म्हणाले कि तू शिकून काय करणार तेव्हा बाबासाहेब म्हणाले कि ते विचारने तुमचे काम नाही. त्या ठिकाणी खुदाबक्ष बेहरामजी इराणी हे त्यांना पर्शियन भाषा शिकवित असत. इतर काही शिक्षक मात्र तिरस्काराने वागत असत. बाबासाहेबांना इंग्रजीचे शिक्षक प्रो.म्युल्लर हे होते. बाबासाहेबांना इंग्रजी आणि पर्शियन भाषेत 75 टक्के मार्क मिळत असत. बाबासाहेबांनी खूप त्रास सहन केला. जातियवाद सहन केला.



1907 मध्ये डॉ.बाबासाहेब मॅट्रिक उत्तीर्ण झाले. तेव्हा सर्वांना खूप आनंद झाला. सर्वांनी त्यांचा सत्कार करण्याचे ठरविले. केळुस्कर(कदम) गुरूजी हे कुणबी समाजाचे सत्यशोधक होते. त्यांनी बाबासाहेबांना खूप मदत केली. त्यांच्यामुळे बडोदाचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. बाबासाहेब 1912 ला बी.ए. झाले. हे अभुतपूर्व घटना होती. रामजीबाबा व इतरांना खूप आनंद झाला. सयाजीराजे गायकवाड खूप सुधारणावादी राजे होते. त्यांनी बाबासाहेबांना अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी 1913 ला पाठविले. डॉ.बाबासाहेबांना तेथे नवल भतेना नावाच्या पारशी धर्माच्या मित्राने खूप साथ दिली. डॉ.बाबासाहेबांनी अमेरिकेत 18-18 तास अभ्यास केला. एम.ए., पीएच.डी झाले. त्यांचा तेथे सत्कार झाला. बाबासाहेब अमेरिकेत असतांना अनेक विषयांचा खूप अभ्यास करायचे. प्रो.सेलिंगमन यांनडॉ.बाबासाहेबांबद्दल फार अभिमान होता.

सुरेश घोरपडे
मो. 9146436310

अमेरिकेतील प्रा.सेलिंगमन म्हणायचे कि 'डॉ.भिमराव आंबेडकर सर्व विद्यार्थ्यांत हुषार आहेत'. डॉ.बाबासाहेब लंडनला शिक्षणासाठी एक वर्षापर्यंत होते. कोलंबिया विद्यापीठात प्रो.सिगर होते. त्यांनी असे म्हटले होते की, भिमरावांची अर्थशास्त्रातील प्रगती एखाद्या प्रोफेसरपेक्षा जास्त आहे. नंतर त्यांनी अर्थशास्त्रात एम.एससी., डी.एससी केली व बॅरिस्टरचे शिक्षण भारतात आल्यानंतर परत लंडनला जाऊन पूर्ण केले. बाबासाहेबांनी 1916 ला लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्रवेश घेतला. तेथे ते एम.एस.सी. व डि.एस.सी. झाले. त्याचवेळेस त्यांनी ग्रेज इन मध्ये प्रवेश घेतला व बॅरिस्टर झाले. बाबासाहेब जर्मनीच्या बॉन विद्यापीठात शिकले. 10 नोव्हेंबर 1918 ला मुंबई सिडनेहॅम कॉलेजात अर्थशास्त्राचे प्राध्यापक झाले. बाबासाहेब महान प्राध्यापक होते. 1919 ला कोल्हापूरचे राजे छत्रपती शाहू महाराज यांनी मुंबईला बाबासाहेबांची भेट घेतली आणि त्यांना मुकनायक नावाचे वर्तमानपत्र काढण्यासाठी आर्थिक मदत केली. त्यांचे भाऊ बाळाराम यांनी त्यांना साथ दिली. नंतर ते लंडनला गेले. जेवणासाठी पैसे नव्हते तरी त्यांनी 21-21 तास अभ्यास केला. 1923 ला ते बॅरिस्टर झाले व भारतात आले. 1927 ला इंग्रजांनी बाबासाहेबांना आमदार नेमले. 1927 ला मनुस्मृती जाळली. लाला लजपतराय याची इच्छा होती की, बाबासाहेबांनी इंग्रजांविरूद्ध लढावे. पण बाबासाहेबांना सामाजिक गुलामगिरी नष्ट करायची होती. सिडनेहॅम कॉलेजमध्ये ते खूप चांगले शिकवायचे. ते विद्यार्थ्यांमध्ये फार लोकप्रिय झाले होते. प्रा.सेलिंगमन बद्दल डॉ.बाबासाहेब म्हणतात 'सेलिंगमन या माझ्या प्राध्यापकांचे माझ्यावरील ऋण अमाप आहे. कारण राजस्वमधील पहिला धडा मी त्यांच्यापासून शिकलो.

जगामध्ये कार्ल मार्क्स, लेनीन, अब्राहम लिंकन, बुकर टी वाशिंग्टन, चर्चिल, चिनचे माओ हे सुद्धा शिकले. पण तेथे सामाजिक विषमता, जातियवाद नव्हता. ाबासाहेबांनी अमेरिकेत 18-18 तास अभ्यास केला. तसेच इंग्लंडमध्ये 21-21 तास अभ्यास केला. त्यांनी समाजकार्यासाठी वकिली सुरू केली. ते कायदेपंडित होते. त्यांना 1936 ला जिल्हा न्यायाधीश पद मिळणार होते. पण त्यांना समाजकार्य करता यावे यासाठी त्यांनी ते नाकारले. 1942 ला त्यांना उच्च न्यायालयाचे न्यायाधीशपद मिळणार होते. पण तेसुद्धा त्यांनी नाकारले. पुढे त्यांनी सामाजिक आंदोलने केली. कोलंबिया विद्यापीठाने बाबासाहेबांचा मोठा पुतळा उभारल्या असून त्याखाली सिम्बॉल ऑफ नॉलेज असे लिहिले आहे. तसेच आमच्या विद्यापीठाच्या विद्यार्थ्याने भारताची राज्यघटना लिहिली आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो असे म्हटले आहे. त्यामुळे बाबासाहेब जगातील महान विद्यार्थी आहेत. त्यांचा आदर्श जगातील व भारतातील सर्वांनी ठेवला पाहिजे. ■■

## आधारस्तंभ

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

कोणे एके काळी काही लोक खोटे बोलायचे, पण माध्यमे सत्यशोधन करायचे. हल्ली काही माध्यमे खोटे बोलतात अन् लोक सत्यशोधन करतात. यातून आपण भावी पिढीवर कोणते संस्कार करीत आहोत याचे भान लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असणाऱ्या माध्यमांनी ठेवायला हवे. कारण एका पिढीचे ढोंग हे पुढील पिढीची परंपरा बनत असते. खोटेपणाला सहज विकता येते, कारण सत्याला खरेदी करता येत नसते. खोटेपणात आकर्षण असले तरी स्थिरता ही सत्यातच असते. खोटेपणा अल्पजीवी असतो पण सत्य कधीही वृद्ध होत नसते. खोट्या व्यक्तींचा मोठा आवाज खऱ्या व्यक्तींना काही काळ गप्प करू शकतो. पण खऱ्या व्यक्तींचे मौनात खोटेपणाची पाळेमुळे उखडून टाकण्याची ताकत असते. प्रामाणिक व्यक्तींना माध्यमांचे हे बदललेले स्वरूप बघून तेवढे दु:ख होत नाही जेवढे त्यांनी माध्यमांवर ठेवलेल्या विश्वासामुळे दु:ख होते. मग त्यांना स्वत:चीच कीव करावी वाटते. प्रामाणिक व्यक्ती आत्मसन्मान अन् स्वाभिमानाची लढाई लढतांना परिणामांची पर्वा करीत नसतात. विनाकारण टिका करणाऱ्यांकडे ते दुर्लक्ष करतात, पण आपल्या कृतीतून अन् कर्तव्यातून या भाडोत्री टिकाकारांचे खोटारडेपण जगापुढे आणतात.पैसा आणि पद ज्यांच्याजवळ असते त्यांच्या मुर्खतापूर्ण गोष्टींनाही माध्यमे नको तेवढी प्रसिद्धी देऊन त्यांचें गोडवे गाण्यात स्वत:ला धन्य मानतात. याउलट पैसा अन् पद नसलेल्या बुद्धीजीवी मंडळींची साधी दखलही घेतल्या जात नाही. जर पद आणि पैशालाच कुणी आपली संपत्ती समजत असेल तर त्यांनी हे कधीही विसरू नये की, एक ना एक दिवस या गोष्टीचा अंत होतो, पण मानसन्मान आणि विश्वसनियता ही संपत्ती अनादी अनंत काळापर्यंत टिकून राहाते. गिधाड जर शहरातील सर्वात उंच इमारतीवर जावून बसले तरी ते कधीही राजहंस होऊ शकत नाही. ते गिधाडच राहाते. कोणतीही व्यक्ती ही आपल्या गुणांनी अन् कर्तृत्वाने महान बनते. पद आणि पैशाने नव्हे.माध्यमे हा तो पाया आहे ज्याचेवर भविष्याची इमारत उभी राहात असते. माध्यमांनी राजाश्रयासाठी प्रयत्न करतांना लोकाश्रयाचा विश्वासघात होऊ नये याचीही काळजी घ्यायला हवी. कारण मेहनत अन् सचोटी ही पायऱ्यांसारखी असते, तर लांगूलचालन हे लिफ्टसारखे असते. लिफ्ट ही कधीही बंद पडू शकते पण पायऱ्या सतत उंचीवर नेत असतात. राजसत्तेचे काय आज आहे तर उद्या नाही. लक्षात असू द्या की, प्रामाणिक व्यक्तींचा कोणताही ब्रँड नसतो. खरे तर प्रामाणिक व्यक्तीच क्रांतीचा ब्रॅन्ड असतात. माध्यमांनी आपल्या स्वार्थासाठी कुणाच्याही हातचे बाहुले बनू नये. त्यांनी आपल्या तत्वावर चालत राहायला हवे. एकदा का तुम्ही तुमची सुत्रे दुसऱ्याच्या हातात दिली की मग त्यांच्या तालावर नाचावे लागते. कारण इतिहास सांगतो की ही मंडळी सिंहालासुद्धा सर्कशीत नाचवते. पितळ बनून गर्दीत राहाण्यापेक्षा हिरा बनून एकटे शोकेसमध्ये एकटे पडून राहा. ज्याच्यात हिम्मत असेल तोच खरेदी करू शकेल. आणि जो एवढे मूल्य देऊन खरेदी करतो. तो त्या हिऱ्याची तेवढीच काळजीही घेतो. कारण सहज प्राप्त होणाऱ्या गोष्टींना वापरून झाल्यावर फेकून दिल्या जाते. सत्य, निष्ठा, प्रमाणिकता हे ते हिरे आहेत ज्यांना विश्वासाचे मूल्य देऊन तत्वाने खरेदी केल्या जाते. ■■

बहुजन सौरभ

# भिमाचे नाव गाजतेय गावगाव...

भिमजंयती अर्थात चौदा एप्रिल म्हणले की सर्वोत्तम आनंदाचा दिवस. हजारो वर्षापासून अंधविश्वास, विषमता, अस्पृश्यता, अज्ञान या मध्ये गुरफटून हक्क अधिकार व मानसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्कच नाकारून माणवाला पशुतुल्य वागणूक देणारी विकृती देशात जोपासली जात होती. प्रगतीची व जागृती ची दारे पुर्णपणे बंद करून वैचारिक मागासलेपणा वाढलेला होता. देशातील सामाजिक परिस्थिती एवढी भयावह होती की माणसाला माणसाच्या सावलीचा ही विटाळ व्हायचा. कामाचे वर्गीकरण करून विशिष्ट कामे विशिष्ट समुहाकडूनच करून घेतले जायचे. विशिष्ट लोकांचे वर्तन जरी निच असले तरीही त्यांना श्रेष्ठ समजण्याचा आग्रह होता. नैसर्गिक साधन संपती चा वापरही सर्वजण सारख्या प्रमाणात करू शकत नव्हते. एवढे वैचारिक व सामाजिक मागासलेल्या देशाला प्रगती, जागृती व देशातील लोकांना समता, बंधुता, न्याय, समान संधी, समान सन्मान, समान अधिकार देऊन माणसाला माणूस म्हणून जगण्याचा व नैसर्गिक आणि सार्वजनिक संपतीचा सारखाच उपभोग घेण्याचा अधिकार बहाल करून खऱ्या अर्थाने देशात संस्कृती पेरण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. याचाच फायदा देशातील करोडो लोकांना होऊन करोडो लोकांचा उद्धार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे झाला. देश एकसंघ बनुन सर्व लोक आनंदाने राहतील अशी व्यवस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण करून दिली. विशिष्ट लोकांनी पेरलेली विकृतीमुळे देश व देशातील जनता कायम कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या गुलामगिरी मध्ये अडकून होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पेरलेल्या संस्कृतीमुळे माणूस हा शारीरिक व वैचारिक स्वातंत्र्य झाला. माणवाला स्वातंत्र्य मिळवून देणारे एकमेव महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विद्वत्ता, कार्य याची दखल जगातील जवळपास सर्वच देशांनी घेतल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक पातळीवरचे विद्वान, सामाजिक क्रांतिकारक व करोडो लोकांचे उद्धारक म्हणून त्यांची ओळख कायम आहे. ज्ञानाचे प्रतिक म्हणून जगातील एकमेव महामानवाला गौरविण्यात आले ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षाची, त्यागाची व कार्याची जाणीव ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माणणारा मोठा वर्ग येथे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एकमेव जयंती अशी आहे की जी प्रत्येक गावात तर साजरी होतेच पण जगाच्या काना कोपऱ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या किर्तीचा व कार्यांचा सुगंध दरवळतो ही अभिमानाची बाब आहे. अशा जागतिक पातळीवरील महामानवाचे आपण अनुयायी आहोत असा विचार केला तर अजुनच स्वतः स्वतःचा गर्व वाटायला लागतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिन हा जगातील सर्वोच्च महोत्सव म्हणून




साजरा केला जातो. जनमानसात स्वंयस्फुर्तीने, स्वंय निधीतून हा महोत्सव साजरा करून आनंद व्यक्त केला जातो. भिज जयंती अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती महोत्सव ज्या उत्साहाने, ज्या आपुलकी साजरा होतो तसा दुसरा दिवस जागतिक पातळीवर शोधुनही सापडणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार यांची जाणीव असलेले लोक आता प्रत्येक जातीधर्मात कमी अधिक प्रमाणात, प्रत्येक गावात आहेत. मुळात विकृती ची पेरणी करून मानसाचे मान सन्मान व अस्तित्व नाकारणाऱ्या विकृत लोकांनी व जातीची घाण डोक्यात असलेल्या आणि मेंदुचा वापर न करणाऱ्या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार जातीत बंध करून धर्मविरोधी दाखवण्याचा बदमाश पणा केला. विकृत लोक स्वतः स्वतःला श्रेष्ठ समजून काही जातींच्या माध्यमातून विकृती चा अजेंडा राबण्याचे काम सतत करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार हे मानवाच्या उद्धाराचे आहेत हेच लोकांना कळू नये यासाठी आजही विकृत लोक त्यांच्या परिने काम करत आहेत. जे लोक जागृत आहेत, जे लोक मेंदुचा वापर करून सत्य शोधण्याचा प्रयत्न करतात आणि जे लोक माणसिक गुलामी झुगारून वैचारिक परिवर्तन करण्याची तयारी दाखवतात अशा प्रत्येक व्यक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्राथमिक आदर्श व मार्गदाते आहेत. भारतीय लोकांची एक मोठी अडचण म्हणजे माणसिक गुलामीची व जातीव्यवस्थेच्या माध्यमातून वैचारिक मागास राहण्याची सवय झाल्याने यांना जातीचे व अज्ञान आणि अंधविश्वास पसरवणारे लोक पाहिजे. जागृत करून शिक्षण आरोग्य समता, बंधुता व राष्ट्रहीत जोपासणारे महामानव यांना नको वाटतात. कारण वर्षानुवर्षे विकृत लोकांच्या विकृत विचाराला संस्कृती म्हणून जोपासले गेले. विकृत विचार लोकांनी सोडू नये म्हणून डोक्यामध्ये भिती निर्माण करून कर्मकांड व अंधविश्वास निर्माण केला. अंधविश्वास आणि कर्मकांड बाजूला सारला तर आज देश महासत्ता होऊन करोडो लोक बंधुभावाने नांदतात. विकृत लोकांचे पोट व व्यवस्था अंधविश्वास आणि कर्मकांडावर असल्याने ते सतत त्याची पेरणी करून लोकांना तत्रज्ञानाच्या युगातही अज्ञानातच ठेवत आहेत. संत बसवेश्वर, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत रविदास महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज,



विनोद सदावर्ते
मो. 9130979300

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वेगवेगळ्या जातीचे परंतु मानव समाजाला जागृत करणारे महामानव व संत होऊन गेले. यांचे विचार व कार्य प्रत्येक मानवासाठी कल्याणाचे आहेत. यांना जातीत बंद करून धर्मविरोधी दाखवण्याचा प्रयत्न हीन लोकांनी केला. पाखंडी, भोंदु लोकांना धर्मगुरू म्हणून मान्यता दिली. जातीव्यवस्थेच्या चिखलात रुतलेल्या लोकांना जातीव्यवस्था ही हवीहवीशी वाटते म्हणून असे विकृत लोक आजही समतावादी व विज्ञानवादी संत महापुरुष आपल्या घरी आनत नाहीत किंवा त्यांचे विचार स्विकारत नाहीत. अशी परिस्थिती असताना ही जेथे जेथे समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय याचा उल्लेख होतो तेथे तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घ्यावेच लागते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रपुरुष जागतिक विद्वान होते. त्यांची बुद्धिमत्ता, कार्य व विचार स्विकारून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एक महामानव म्हणून स्विकारले तर मानवाच्या सर्व समस्या नष्ट होऊन सर्वांना विकासाची दारे खुली होतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे वैचारिक दृष्टीने आणि सामाजिक व आर्थिक दृष्टीने आता बौद्ध चांगल्या प्रमाणावर सुधारलेले दिसतात. काही मतीमंद लोकांच्या मते बौद्धांचा विकास आरक्षणामुळे झाला. अशा लोकांना बौद्धत्तेतर लोकांना ही आरक्षण आहे आणि ते वैचारिक दृष्टीने मागास आहेत याची जाणीव होत नसेल का? उलटपक्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा कोणत्याही जाती धर्मातील व्यक्ती स्वाभिमानाने जिवन जगून निरपेक्ष व निडर बनतो. हेच परिवर्तन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. महिलांचा पाठीराखा, महिलांना हक्क अधिकार आणि सन्मान मिळून देण्यासाठी राजीनामा देणारे एकमेव मंत्री म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. महिलांचा जो आज साज आहे, जो स्वाभिमान व स्वातंत्र्य आहे हे केवळ आणि केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. जेव्हा महिला हक्क अधिकार आणि समतेच्या व संधिच्या गोष्टी करते तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा जय झालेला असतो. बहुतांश महिलांना याची जाणीव नाही तो भाग वेगळा. ज्यांना याची जाणीव आहे अशा महिला सुद्धां डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचाराचा प्रचार आणि प्रसार सतत करत असतात.

विषमतावादी लोक सोडले तर समतावादी आणि विज्ञानवादी लोक दररोज प्रत्यक्ष अप्रत्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर प्रबोधन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नावाचा गवगवा केला जातो. मानवी विकासाला अडसर ठरणारी विकृती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मातीत गाडून माणासाला माणूस म्हणून वागवणारी, सन्मान व संधी निर्माण करून देणारी आणि सामाजिक संस्कार घालणारी व्यवस्था निर्माण करून करोडो कुळांचा उद्धार केला. अशा या महामानवाचे नाव जगभरात गाजने साहजिकच आहे. स्त्रियांचे मुक्तीदाते, प्रत्येक मानवाचे उद्धारक, देशाचे शिल्पकार, भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला व विचारांना अभिवादन आणि जयंती च्या मंगलमय सदिच्छा.. ■■

# कामगार सुविधा केंद्र कंत्राटी कर्मचारी आणि सरकारी अधिकारी



अर्ज भरल्यावर कागदपत्रांच्या पडताळणीसाठी कामगारांना आपल्या सोयीची तारीख निवडावी लागेल. 6 फेब्रुवारी 2025 पासून या तारखा निवडण्याची सुविधा दिलेली आहे. निवडलेल्या तारखेस मूळ कागदपत्रांसह निवडलेल्या सुविधा केंद्रावर हजर रहावे लागेल. ठरलेल्या तारखेस व ठिकाणी हजर न राहिल्यास अर्ज नामंजूर करण्यात येतील. लाभाच्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठी जागा व तारीख निवडण्याबाबत ज्या लोकांनी IWBMS प्रणालीमध्ये कागदपत्रांच्या पडताळणीसाठी अगोदरच तारीख घेतलेली आहे त्यांची ती तारीख रद्द करण्यात आलेली आहे. आता ते कामगार भरलेल्या लाभाच्या अर्जाच्या कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दिलेल्या लिंकवरून नवीन तारीख निवडू शकतात. रद्द झालेल्या तारखेऐवजी नवीन तारीख निवडण्यासाठी "Change Claim Appointment Date" या बटनावर क्लीक करावे. सिस्टिम तुम्हाला तुमचा नोंदणी क्रमांक विचारेल. नोंदणी क्रमांक भरल्यावर तुम्ही रजिस्टर केलेल्या मोबाइलवर एक OTP येईल. OTP पडताळल्यानंतर तुम्हाला ज्या लाभाच्या अर्जाची तारीख बदलायची आहे त्याचा पोचपावती क्रमांक भरावयाचा आहे. त्यानंतर तुम्ही कागदपत्रांच्या पडताळणीसाठी जागा व दिनांक निवडू शकता. त्यानंतर अर्ज प्रणालीमध्ये सबमिट करू शकता. इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तीचे नियमन करण्यासाठी व त्यांच्या सुरक्षा, आरोग्य व कल्याणासाठी उपाययोजना ही माहिती वेबसाईटवर दिली आहे. परंतु यानुसार एकाही तालुका सुविधा केंद्रात काम होत नाही. तालुका सुविधा केंद्र टाकण्याचे कारण काय होते? तेथे सर्व कामगारांचे फॉर्म रिजेक्ट, मंजुरी फॉर्म, आतील सर्व त्रुटी, मोबाईल चेंज करणे, नाव दुरुस्ती यासाठी आपणास तेथे दोन कामगार कागदावर दाखवले आणि हवे आहेत. पण तिथे एकच कामगार असतो. दोन दोन लाख खर्च करून तालुका सुविधा सेतू केंद्र टाकण्याची आवश्यकता नव्हती, किंवा तहसील कार्यालयामध्ये सेतू केंद्र सुविधा आहे, किंवा ग्रामपंचायत तेथे सेतू सुविधा आहे. तसेच दवाखान्यावरती भरपूर खर्च होतो आहे, टेस्ट करणे हे सुद्धा प्रति सरकारी दवाखान्यांमध्ये सुद्धा आहे, कामगारांच्या कल्याणकारी योजनेच्या नांवावर हा सरकारचा पैसा वाया जात आहे. ज्या बांधकाम कामगारांना जो लाभ मिळत आहे तो कामगार या दवाखान्यापासून या सर्व 32 योजनेपासून वंचित राहत आहे. जर मंडळाचा पैसा जर एका तालुक्यात अकरा सेंटर झाले तर त्यांचा भाड्या सहित पगार महिन्याचा 22 लाख, तर वर्षाचा किती होईल? तर हा सर्व कामगारांचा पैसा कामगारापर्यंत पोहोचला पाहिजे. पण तालुका सुविधा केंद्र कंत्राटी कर्मचारी आणि सरकारी अधिकारी

*मंडळाच्या आदेशानुसार दिनांक 5 फेब्रुवारी 2025 पासून तालुका सुविधा केंद्रात डेटा एन्ट्रीचे काम बंद करण्यात येत आहे. बांधकाम कामगार आपले नोंदणी, नूतनीकरण व लाभाचे अर्ज ऑन लाईन पद्धतीने आपल्या सोयीच्या जागेवरून भरु शकतील.*

## भ्रष्टाचाराचे केंद

कोणाला न घाबरत दलाल हाताशी धरून प्रचंड भ्रष्टाचार करीत आहेत. मंडळाचा सर्व पैसा हा तालुका सुविधा केंद्र कंत्राटदार व त्यांचे कंत्राटी कर्मचारी यांच्या खिशात जात आहे. जिल्ह्याचे कामगार आयुक्त साहेब व त्यांच्या कार्यालयत सुद्धा भ्रष्टाचार होत आहे. त्या कार्यालयातील प्रमुख इन्चार्ज मुळातच कोणालाही घाबरत नाही. बिनधास्तपणे बांधकाम कामगारांची लूट करत आहेत. हे थांबण्याविण्यासाठी कामगार मंत्र्यांनी विशेष करून लक्ष दिले पाहिजे. गाव पातळीवरील ग्रामसेवक यांनी ही कर्तव्यदक्ष कर्मचारी म्हणून लक्ष दिले पाहिजे. या गावातून किती कामगारांची नांव नोंदणी झालेले आहे? व त्यात किती खरे कामगार आहेत? हे तपासणी गावकारींनी केली तर कुठेतरी असंघटित बांधकाम कामगारांना न्याय मिळवून देणारी व्यवस्था व्यवस्थित चालेल असे आम्हाला वाटत आहे. तालुका सुविधा केंद्रामध्ये तपासणी व्यतिरिक्त कामगारांना दुसरी काहीच काम नाही. जे काम इथे झाले तर जिल्ह्यात तरी जायची काहीच कारण नाही. वेबसाईट वरती दिलेल्या नियमानुसार सर्व ज्या गोष्टी आहेत त्या सर्व उपलब्ध झाल्या पाहिजेत, जिल्ह्यावरती कार्यालयत गेले की दारातच टेस्टींचे लाभ लावलेला आहेत. कामगारांचे तीन बाटल्या रक्त काढून घ्यायची त्याला प्रमाणपत्र द्यायची व त्याला दवाखान्याचा कुठलाच खर्च करायचा नाही, नुसतेच पैसे मिळवण्याचे काम चालू आहे. मुलामुलीच्या शिक्षणातील स्कॉलरशिपचा फॉर्म भरायला गेले. पहिले की रक्त काढून घ्यायची बळजबरीने असे काम चालू आहे. जिल्हास्तरीय कामगारांना दवाखान्याची कुठली सुविधा नाही. जी शासनाने नेमून दिलेला दवाखाना तो सुद्धा हे काम करत नाही. सध्या लग्नाची, डिलिव्हरीची व इतर मोठे लाभ ऑनलाईन बंद आहेत. हे असे का तर पूर्वत नोंदणी व्हावी. कामगाराला कुठल्या पद्धतीचा त्रास होऊ नये. एका फॉर्मला वर्षे जात आहे. मंजुरीसाठी या सर्व गोष्टी बंद कराव्यात. तळागाळातील भरपूर कष्टकरी बांधकाम कामगार आहेत, त्यांचे हातावर पोट आहे ते रोजच्या रोज नाक्यावरती उभे राहून मिळेल ते काम करून पोट भारतात. वेळेला जेवणाची व्यवस्था नसते त्यांना ऑफिस व ऑफिस मधील कर्मचारी नावाची काय चीज आहे हे माहित नाही. तेव्हा तालुका सुविधा केंद्र कंत्राटदार व त्यांचे कंत्राटी कर्मचारी त्यांचे इन्चार्ज लोक व बोगस नोंदणी करणारे दलाल यांची मिळूनमिसळून मोठ्या प्रमाणात कामगारांची फसवणूक चालू आहे. हा भ्रष्टाचार बंद करायला हवा. सर्वसामान्य कामगारांना न्याय मिळेल. बहुसंख्य बांधकाम कामगारांना या कामकाजाचा कुठलाही गंध नाही. बोगस कामगार स्वतः ऑफिसवाले त्यांचे नातलग, आप्तेष्ट व इन्चार्ज पैसे घेऊन काम करत आहे. त्यांचेच फॉर्म भरले जात आहेत. असंघटित कष्टकरी बांधकाम कामगारांचे गरिबाचे काय ते चालत नाही. गरीब कामगारांची व्यथा सांगण्यासारखी भरपूर आहे. मंत्री, पुढारी त्यांच्या स्वार्थासाठी कामगारांचा उपयोग करून घेत आहे व नंतर त्यांना विसरत आहेत, तर असू देत, यात काहीतरी मोठा बदल हवा ही आमची महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समितीला कळकळीची विनंती आहे. ■■



सागर रामभाऊ तायडे
9920403859

# आपणास ताजमहाल माहित आहे !



*पण त्याच आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराजांना जेथे नजर कैदेत ठेवले होते ती जागा माहित आहे का? कधी आपण कधी ताजमहालऐवजी ती जागा पहायला जाऊ असा विचार केला आहे का?*

29 नोव्हेंबर 2024 या दिवशी आग्रा येथे पर्यटनासाठी गेलो होतो. दोन दिवस आधी जयपुर फिरून झाले होते. जयपूरहून निघून आग्र्याला येताना रस्त्यात फतेहपूर सिक्री बघितले. तेथील मुघल बादशाह अकबर यांचा भव्य महाल बघितला. तिथल्या गाईडच्या तोंडून अकबराच्या हिंदू पत्नी जोधाबाई यांच्यासाठी बांधलेला महाल, त्यांच्यासाठीच स्वतंत्र स्वयंपाक घर इत्यादी, इत्यादी बघून झाले.

दुसऱ्या दिवशी आग्र्याला आल्यावर प्रथम आग्र्याचा किल्ला बघितला. भरपूर भव्यदिव्य आहे. सोबत गाईड घेतलेला असल्यामुळे बरीच माहिती, छोटे छोटे बारकावे तो सांगत होता. हा किल्ला बघत असतानाच एका सुंदर अशा महालात गाईडने माहिती दिली की इथे औरंगजेबाने आपल्या वडिलांना कैदेत ठेवले होते. त्यांच्या आयुष्याची शेवटची आठ वर्षे ते इथेच कैदेत राहिले. तिथून ताजमहालाची भव्य वास्तू स्पष्ट दिसत होती. या ताजमहालाकडे बघत बघतच त्यांच्या कैदेतली वर्षे संपलीत. कैदेतच त्यांचा अंत झाला.. अर्थात हा सगळा इतिहास ऐकला.

आम्ही गाईडला विचारत होते, आग्र्यामध्ये शिवाजी महाराजांना जिथे कैदेत ठेवले गेले होते ती जागा कोणती? ती आम्हाला बघायची आहे.

गाईडने उडवा उडवीची उत्तरे द्यायला सुरुवात केली होती. किल्ल्यामध्ये तर तशी कुठलीही जागा नव्हती, जिथे त्यांनी शिवाजी महाराज येथे होते असे सांगितले. शेवटी गुगल बाबाची मदत घेऊन गाईडला गुगल वरील लोकेशन दाखवले. 'शिवाजी महाराजांना कैदेत ठेवलेली जागा' असे गुगलवर टाकले तेव्हा या किल्ल्यापासून पाच किलोमीटर वरील एक लोकेशन गुगलने दाखवले. गाईडने अर्थातच खांदे उडवले. आमच्याबरोबर येण्यासाठी त्यांनी नकार दिला. पण आमच्या मनातली जिज्ञासा संपली नव्हती. आपण आग्र्यामध्ये दोन दिवस राहायचे, अकबर, जहांगीर यांचे राजवाडे बघायचे, शहाजहान आणि मुमताज यांच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून ताजमहालापुढे नतमस्तक व्हायचे आणि ज्या साम्राज्यामध्ये आमचा मराठी राजा शंभर दिवस कैदेत होता त्या जागेवर, त्या वास्तूमध्ये माथा न टेकता आग्रा सोडायचे हे आमच्या मनाला पटेना. गाईडला निरोप देऊन आम्ही किल्ल्याच्या बाहेर पडलो आणि गुगल लोकेशननुसार शिवाजी महाराजांच्या कैदेचे ठिकाण शोधायला सुरुवात केली. सात जणांचा ग्रूप बरोबर असल्यामुळे आम्ही टेम्पो ट्रॅव्हलर सारखी एक मोठी गाडी केलेली होती. तीच गाडी घेऊन निघालो. आग्रा शहर एका बाजूला टाकून बाहेरच्या रस्त्याला लागलो. शहरापासून लांब नव्हता, पण शहराच्या बाहेरून जाणारा म्हणजे एखाद्या गावकुसासारखा तो रस्ता होता. लोकेशनच्या साधारण एक किलोमीटर अलीकडे आमची गाडी थांबली. पुढचा रस्ता नीरुंद आणि काटेरी झाडांनी वेढलेला होता. ड्रायव्हरने गाडीवर ओरखडे पडायला नकोत म्हणून पुढे येण्यास नकार दिला. गाडी तिथेच उभी करुन आम्ही चौघे चालत चालत त्या रस्त्याला लागलो. रस्त्याच्या एका बाजूला गावकुसाबाहेरची वस्ती जाणवत होती. रस्ता काटेरी तर होताच वर अस्वच्छही खूप होता. पायाखालच्या रस्त्याचे, रस्त्याकडेच्या घाणीचे फार काही वाटतच नव्हते, कारण 400 मीटरच्या अंतरावर आपल्याला हवे ते ठिकाण दिसू लागले होते. शेवटी एका खूप मोठ्या इमारतीजवळ आम्ही येऊन थांबलो. भले मोठे लोखंडी गेट बंद होते. आजूबाजूला झाडी वाढलेली होती.

'राजा जय किशनदास भवन' असे या इमारतीवर नाव होते. गेटजवळ गेल्यावर एक छोटेसे फाटक नजरेत आले. त्याला कडी होती पण कुलूप नव्हते. कडी काढून सरळ आत घुसलो. आजूबाजूला कुणीही दिसत नव्हते. गेटच्या आत मात्र स्वच्छता होती. हवेली पूर्ण बंद होती पण कोणाचातरी वावर तिथे आजूबाजूला आहे एवढे लक्षात येत होते. कुणाला काही विचारावे असे आजूबाजूला कोणी नजरेतही येईना. इतक्यात शेजारच्या वस्तीतील एक जण आमच्यासमोर आला. 'क्या चाहिये आपको?' आम्ही थोडेसे चाचरतच त्याच्याशी बोलायला सुरुवात केली. आम्ही महाराष्ट्रातून आलो आहोत आणि शिवाजी महाराजांना जिथे कैदेत ठेवले होते ती जागा बघण्यासाठी बाहेर पडलो आहोत. गुगलने आम्हाला या जागेवर आणून सोडले आहे, हे सांगताच त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. 'आप सही जगह पर आये हो' त्याच्या तोंडून हे वाक्य ऐकले आणि अंगावर सरसरून रोमांच उभे राहिले. त्या माणसाने जी काही माहिती दिली ती अशी होती, 'या इमारतीला 'कोठी मीना बाजार' किंवा 'कोठी मीना बाजार हवेली' असे म्हणतात. शिवाजी महाराजांना अटक करून इथेच नजरकैदेत ठेवले होते. 99 दिवस ते इथे होते आणि शंभरव्या दिवशी ते इथून निसटले.

मुघल राजवटीनंतरच्या काळात कोठी मीना बाजार हवेली ब्रिटिशांच्या ताब्यात होती. ब्रिटिशांनी जेव्हा त्यांची राजधानी आग्र्याहून दिल्लीला हलवली, तेव्हा 1857 मधे ही कोठी लिलावात विकली होती. राजा जय किशनदास या व्यक्तीने ती खरेदी केली होती. सध्या राजा जयकिशनदास यांचेही कुणी वारसदार या कोठीमध्ये राहत नाहीत. फक्त त्या कोठीची देखभाल करण्यासाठी एक-दोन कुटुंब आजूबाजूला आहेत. बाकी बऱ्याचशा जागेवर अतिक्रमण पण झालेले आहे. गुगल सर्चवर नंतर बरीच माहिती वाचायला मिळाली. त्यामध्ये उत्तर प्रदेश सरकारने या जागेत शिवाजी महाराजांचे स्मारक बनविण्याचा घाट घातलेला आहे. त्याला अर्थातच स्थानिक जागा बळकावणाऱ्यांनी विरोधही केलेला आहे आणि हा निर्णय कायद्याच्या आधीन आहे. त्यामुळे ही वास्तू जैसे थे अशी उभी आहे. तिथे कोणत्याही प्रकारचा बोर्ड लावण्यात आलेला नाही. फक्त ब्रिटिशांनी ही वास्तू राजा जयकिशन दासला लिलावात दिल्याचा उल्लेख असलेली एक पाटी तिथे बघायला मिळाली.

दरवाजे अर्थातच बंद असल्यामुळे आत जाता आले नाही. तिथेच बाहेर उभे राहून शिवाजी महाराजांच्या धैर्याला, धाडसाला आणि शौर्याला आठवत नतमस्तक झालो. डोळे भरून ती वास्तू मनात साठवली आणि परत फिरलो. चार-पाच दिवसांच्या सहलीमधे जयपूरचा हवामहल, अमेर फोर्ट, फत्तेपूर सिक्रीचा अकबराचा किल्ला, आग्र्याचा किल्ला, ताजमहाल हे सगळे बघत फिरत होतो. पण या ट्रिपमध्ये खरे समाधान वाटले ते मीना बाजार कोठीची इमारत बघून. इथे लवकरच शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे आणि आग्र्यात जाणाऱ्या तमाम मराठी माणसाची पाऊले इकडेही आधी वळवीत असे मनोमन वाटले. या मीना बाजार कोठीपर्यंत पोहोचता आले याबाबत खूप समाधान वाटले. पूर्वी आग्रा फिरताना हा इतिहास आपल्याला आठवलाही नव्हता याची खंत सुद्धा वाटली. असो. आपणही कधी आग्रा येथे गेला तर जरूर जरूर या पवित्र वास्तूला भेट द्या. ■■

संकलन - जयंत जगताप

# देशाचे आणि समाजाचे चित्र कुठे बिघडले आहे हे व्यंगचित्र दाखवते : नागराज मंजुळे

## अंनिसच्या 'विवेकरेषा' या व्यंगचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन



**नागपूर :** व्यंगचित्र वास्तव अधिक उजागर करून मांडते. स्वतःला कुरूप बघणे कोणालाच आवडत नाही पण तुमच्यात नेमके काय कमी आहे, हे व्यंगचित्र दाखवते. देशाचे आणि समाजाचे चित्र कुठे बिघडले आहे हे योग्य आणि बोलक्या रितीने व्यंगचित्रातून मांडले जाते. त्याला कोणताही फिल्टर नसतो, म्हणून ते प्रभावी ठरते. व्यक्ती असो वा समाज त्याला व्यंगचित्राची गरज आहे, असे विधान सुप्रसिद्ध दिग्दर्शक व कवी नागराज मंजुळे यांनी केले. ते महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने आयोजित केलेल्या 'विवेकरेषा' या व्यंगचित्र प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार मंजुल या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, आम्ही व्यंगचित्राच्या माध्यमातून प्रश्न विचारतो. जो कोणी चमकदाराला नमस्कार करतो, त्या गोष्टीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. कोणी नेता आपण अजैविक असल्याचा दावा करतो, त्यावर आम्ही व्यंगचित्रातुन प्रश्न विचारतो. सा. मार्मिकचे व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव हे या व्यंगचित्र प्रदर्शनाचे संयोजक आहेत. त्यांनी आपल्या मनोगतात त्यांचा सनातनी विचारांपासून ते महा. अंनिस पर्यंतचा प्रवास कसा झाला हे सांगितले. ते म्हणाले, फुले-शाहू- आंबेडकर ते दाभोलकरां पर्यंतचे विचार हे अंधश्रद्धेविरूद्धची लस आहे, ती फक्त आपल्याला सर्वत्र न्यायची आहे.

पटकथा लेखक अरविंद जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हुकुमशाही जेवढी जोरात असते तेवढा विनोद खुलत असतो. व्यंगचित्रकारांच्या कलेबरोबर हिंमतीला पण दाद दिली पाहिजे. राजकारणी नेते व व्यंगचित्रकार याचे बोलणे होईल असा काळ पाहिजे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या व्यंगचित्र प्रदर्शनाच्या निमित्ताने व्यंगचित्र स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती, त्या सर्व विजेत्या स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन रुपाली आर्डे यांनी केले. प्रास्ताविक मुक्ता दाभोलकर यांनी केले. श्रीपाल ललवाणी, अनिल वेल्हाळ, मिलिंद देशमुख, संजय मालती कमलाकर, श्रीराम नलावडे, अरविंद पाखले, दीपक गिरमे, गणेश चिंचोले, सौरभ बागडे इ. कार्यकर्ते उपस्थित होते.




रमाईचे स्वप्न - ५१

**महाप्रजापती गौतमी बुध्द विहार**
नागार्जुन कॉलोनी, नारा रोड, नागपूर-14
स्थापना 1991, विहारात रोज पहाटे 5.30 वाजता भिक्खूनी वंदना घेतात. रोज सायंकाळी 6 वाजता वंदना घेतात, 50 ते 60 विद्यार्थ्यांसाठी निशुल्क वाचनालय. विहारात येणारा खर्च दानातून केला जातो. दर पौर्णिमेस नागपुरातील विविध विहारातील भिक्खूनी पातीमोक्ख करण्यासाठी येतात (दोषांची कबुली करण्याची प्रक्रिया). विहारात इच्छुक उपासिकिंना श्रामनेरीची दीक्षा दिली जाते. दि. 29 मार्च 2025 रोजी यवतमाळ येथे आयोजित महाबोधी महाविहार आंदोलनात एकुण 15 श्रामनिरी यांनी सहभाग नोंदवला, आज या विहारात सम्राट अशोक जयंती .

संवाद मित्र, शीलाचारा आर्या
7028438615

## महत्वाचे

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्म अकादमी येथे 12 व 13 एप्रिलला धम्म व उपोसत शिबिर

**नागपूर :** बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय धम्म अकादमी, मौजे, राजुल वाडी तालुका उमरेड, जिल्हा नागपूर येथे चैत्र पौर्णिमेनिमित्त शनिवार दि. 12 व रविवार दि. 13 एप्रिल रोजी चैत्र पौर्णिमा निमित्त उपोसत शिबिर तसेच एक दिवसीय धम्म शिबिर सुद्धा आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात भाग घेण्यासाठी डॉ. माया ब्राह्मणे 9422468746, प्राचार्य नरेंद्र शेंडे 9423413152, राजरतन कुंभारे 94221114165 आदींच्या मोबाईल क्रमांकावर इच्छुकांनी संपर्क साधावा. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय धम्म अकादमी येथे दर पौर्णिमेला धम्म शिबिर आयोजित केले जात असते. तसेच दर महिन्याच्या पौर्णिमेला, अमावस्येला व अष्टमीच्या दिवशी उपोसत आयोजित केले जाते.

### सम्राट अशोक नागरी सहकारी पत संस्थेत सम्राट अशोक जयंती साजरी



**नागपूर :** सम्राट अशोक नागरी सहकारी पथ संस्था नागपूर वैशाली नगर नागपूर येथे सम्राट अशोक जयंती साजरी करन्यात आले. अध्यक्ष ॲड. महेंद्र बनसोड, उपाध्यक्ष, शशीकुमार कांबळे, डॉ.संजय चौधरी, ॲड उमेश वाघमारे, बी.टी. वाहणे, लियाकत अली, एम.झे. काझी, विजय रामटेके, सुनील गजभिये, रायभान गायकवाड, बबलू भास्कर, शिवशंकर रंगारी, अंकुश बनसोड, साबिया वकील, सोनू भास्कर, शलाका शंभरकर, रुखमाबाई पंचबुद्धे उपस्थित होते.

### नयापुरा हायस्कूलच्या शांतिनगरच्या विद्यार्थ्यांची कराटे स्पर्धेत चमक दाखवली



**गोंदिया :** दि. न्यू.एज.एजू. सोसायटी बाळभाऊ पेठ नागपूर आणि नयापुरा हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथील नयापुरा हायस्कूल, शांती नगर येथे शालेय स्तरावरील कराटे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. नयापुरा हायस्कूलच्या खेळाडूंनी एकदिवसीय कराटे स्पर्धेत भाग घेतला आणि चमकदार कामगिरी करत पदके जिंकली. अंजली सावतकर, तसेच जे.बी. कंगाले सरांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे लेमन मेश्राम आणि संविधान लोखंडे उपस्थित होते. नयापुरा हायस्कूलच्या कराटे प्रशिक्षक सेंसेई प्रदन्या शैलेश घरडे व इत्यादी प्रमुख उपस्थित होते. स्पर्धेत मुलांच्या गटात प्रियांशु सोनवणे आणि मुलींच्या गटात आंचल बोरसरे ही सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. विजेत्यांना कराटे ड्रेस, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र बक्षीस म्हणून वाटण्यात आले. सर्वोत्तम काता खेळाडू अभिषेक शाहू, लावण्या पोटभरे, सर्वोत्तम कुमिते खेळाडू समर्थ कौसरे, वंशिका देवांगन, सेंसेई नेहाली गजभिये, सेंसेई रुचिका हटकर, सेंसेई विदिशा भैसारे, आणि पुरस्कार वितरण समारंभचा कार्यक्रम एस.टी. पाटिल यानी केले. पदक विजेते खेळाडू ऋषिकेश बोरसरे, रोहित राऊत, मोईनुद्दीन शेख, लक्ष्मी पाल, सोनू यादव, संजीवनी बोरकर, तारकेश्वर वर्मा, आशिष पराते, सोनी शाह, चांदनी शाह, हर्ष तितराम, क्रिश डिसुजा

## निधन वार्ता

### ॲड. बापूराव सुखदेवे



**नागपूर :** 5 एप्रिल बॅंक कॉलनी, नारी रोड येथील रहिवासी उच्च न्यायालयाचे वकील ॲड. बापूराव जयराम सुखदेवे यांचे शनिवार, दि. 05 एप्रिल रोजी विवेका हॉस्पिटल येथे हृदय विकाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे 77 वर्षांचे वय होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. रविवार, दि. 6 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता बारसेघाट, वैशालीनगर, नागपूर येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## बीआरएसपी द्वारा सम्राट अशोक जयंती साजरी




**नागपूर :** बुद्ध धम्माला राजाश्रय देऊन स्वतःची मुलगी संघमित्रा आणि मुलगा महेंद्र यांना धम्म कार्यासाठी दान देणारा प्रियदर्शी राजा सम्राट अशोक यांची 2329 वी जयंती बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी द्वारा त्रिशरणचौक येथील कार्यालयात साजरी करण्यात आली. बी आर एस पी चे राष्ट्रीय उपाध्यक्ष रमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात बी आर एस पी चे जेष्ठ नेते आंबेडकरी इतिहासाचे अभ्यासक राम घोडेस्वार यांनी मुख्य अतिथी म्हणून मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात रमेश पाटील म्हणाले की, सम्राट अशोक यांनी सत्तेचा वापर समाज कल्याण साधण्यासाठी केला.बहुजन चळवळीचे प्रणेते मा.कांशीरामजी हे नेहमी म्हणत असत की ,मेरे सपनोंका भारत सम्राट अशोक के भारत जैसा होगा , यावरून सम्राट अशोककालीन भारताची आपण कल्पना करू शकतो.तसा भारत उभा करण्यासाठी आज परिवर्तनाची चळवळ गतिमान करणे आवश्यक आहे. माजी नगरसेविका बीआरएसपी नेत्या विश्रांती झांबरे, एसटी पाझारे यांचे ही याप्रसंगी भाषण झाले. संचालन सुनंदा गायकवाड यांनी केले तर अतुल साखरे यांनी आभारप्रदर्शन केले.

## विहार संवाद समितीच्यावतीने प्रबोधन




**नागपूर :** पुरोगामी प्रबोधन चळवळी द्वारे, विहार संवाद समितीच्या वतीने, जेतवन बुद्ध विहार, कपिलनगर येथे सम्राट अशोक जयंतीचे अवचित्य साधून प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक विहार संवाद समिती विदर्भाच्या अध्यक्ष ज्योत्स्ना बनसोड उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रामटेके, विहार संवाद समितीच्या सदस्य शिल्पा मकेश्वर, सुनील खोब्रागडे, पुरोगामी प्रबोधन चळवळीचे अध्यक्ष रवी हाडे, पुरोगामी प्रबोधन चळवळीचे कोषाध्यक्ष रंगराज गोसावी, यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक ज्योत्स्ना बनसोड यांनी बुद्धांनी सांगितलेले पंचशील तत्व आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या 22 प्रतिज्ञा, आपल्या जीवनात किती महत्त्वाच्या आहेत आणि त्यानुसार जीवन व्यतीत केले तर, कोणतेही दुःख जीवनात येणार नाही आणि सामाजिक आर्थिक, राजकीय प्रगती होण्यास कुणीही थांबवू शकणार नाही, हे सांगून त्याचे महत्त्व पटवून दिले. शिल्पा मकेश्वर यांनी आर्य अष्टांगिक मार्ग यावर सविस्तर माहिती दिली तर, रंगराज गोसावी यांनी आजच्या युवा पिढीला धम्म किती महत्त्वाचा आहे आणि तो समजून घेणे गरजेचे आहे हे सांगितले. तसेच सुनील खोब्रागडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची आज किती गरज आहे हे प्रखरतेने सांगितले. प्रस्तावना रवी हाडे यांनी केले असून संचालन वैद्य काकूंनी केल, तर या कार्यक्रमाला संपूर्ण जेतवन बुद्ध विहार कपिल नगर येथील उपासक उपासिका उपस्थित असून कार्यक्रम यशस्वीतेसाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. एकूणच विहार संवाद समितीचा हा पहिला कार्यक्रम असून अगदी चांगल्या प्रकारे पार पडला. त्यामुळे समितीच्या कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणीत झाला.

## गोरेवाड्यात भरधाव टिप्परच्या धडकेत एकाचा मृत्यू, 4 जखमी



**नागपूर :** अनियंत्रित झालेल्या भरधाव टिप्परने रस्त्याच्या कडेला उभ्या कारला मागून धडक दिली. त्यानंतर टिप्पर एका पानठेल्यात शिरला. टिप्परच्या धडकेत कारचा चुराडा झाला. या अपघातात कारमधील एक जण जागीच ठार झाला तर चौघे जण जखमी झाले. हा अपघात रविवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास शहरातील गोरेवाडा परिसरातील पलोटी शाळेसमोर झाला. या अपघातानंतर घटनास्थळावर एकच गर्दी झाली. पोलिसांनी चक्क क्रेनचा वापर करुन चुराडा झालेली कार रस्त्याच्या बाजुला केली. या घटनेनंतर आरोपी टिप्परचालक पळून गेला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक भरधाव टिप्पर गोरेवाडा पलोटी शाळेसमोरून जात होता. त्या टिप्परचे ब्रेक निकामी झाले. त्यामुळे टिप्परचालकाचे वाहनावर नियंत्रण सुटले. भरधाव टिप्पर समोर असलेल्या एका कारवर आदळला. त्यानंतर टिप्पर रस्त्याच्या कडेला असलेल्या पानठेल्यात शिरला. या अपघातात कारचा चुराडा झाला. या कारच्या दरवाज्यात फसल्याने कारचालकाचा जागीच मृत्यू झाला. तर पानठेलाचालक आणि तीन ग्राहक असे एकून चार जण जखमी झाले. पानठेलाचालकाला जबर मार लागला असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. टिप्परच्या समोरील भागामध्ये कार फसली. त्यामुळे चालकाचा दबल्याने गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. चारही जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. अपघाताची माहिती मिळताच गिट्टीखदानचे पोलीस निरीक्षक कैलाश देशमाने हे पथकासह घटनास्थळावर पोहचले. त्यांनी चुराडा झालेल्या कारला काढण्यासाठी क्रेन बोलावली.



## भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दल आणि भिमजयंती मंडळ संयुक्त

**लोहा :** लोहा तालुक्यातील तसेच नांदेड दक्षिण मतदार संघातील सोनखेड सर्कल अंतर्गत येत असलेल्या, जवळा (दे) या गावांमध्ये विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी चक्रवर्ती राजा सम्राट अशोक जयंती साजरी करण्यात आली.यावेळी भारतीय बौद्ध महासभा नांदेड जिल्हा संरक्षण सचिव तथा आकाशवाणी नांदेड प्रासंगिक निवेदक आयु. आनंद गोडबोले यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी सम्राट अशोक जयंती दिनाच्या अनुषंगाने सम्राट अशोक हे अखंड भारताचे राजे होते. तसेच कलिंग युध्दातील विजयानंतर झालेली जिवीतहानी पाहुन, राजाने बौद्ध धम्म स्वीकारला. आणि त्याचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण जगभर केला. एवढेच नाही तर, लाखो बुद्ध विहार बांधुन बुद्ध धम्माचा प्रचार केला. आणि असे संस्कार आजकालच्या युवा पिढीवर होणे गरजेचे आहे. असे उद्गार आनंद गोडबोले यांनी काढले. विश्वशांती बुद्ध विहार जवळा आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये प्रथम गौतम बुद्ध चक्रवर्ती राजा सम्राट अशोक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्प अर्पण करून दिपाने व धुपाने पुजा करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या ठिकाणी आनंद पुरभाजी गोडबोले, रोहिदास गोडबोले, रविकांत गच्चे, गुणवंत बालाजी गच्चे, भिमराव चांदु गोडबोले, विलास पांडुरंग गोडबोले, वसंत नागोराव गोडबोले, पंकज पुरभाजी गोडबोले, उपासक सुरज कैलास गोडबोले, साई भिमराव गोडबोले, मिलिंद बाबुराव गोडबोले, वसंत हिंगोले, धम्मदिप गोडबोले, सुंदरबाई पुरभाजी गोडबोले, विमलबाई गोडबोले, मयुरी गोडबोले, सोनाली गोडबोले, सम्राट गोडबोले, साक्षी गोडबोले, अपेक्षा गोडबोले, शाश्वती गच्चे, कावेरी गच्चे, रितेश गवारे, आकांक्षा गोडबोले, यांच्या सह भारतीय बौद्ध महासभा ग्रामशाखा, विध्यार्थी भिमजयंती मंडळ, विर्श्वशांती बुद्ध विहार कमिटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, उपासक,उपासिका व बालक बालिका यांची उपस्थिती होती.

## प्रसेनजित गायकवाड यांना महाराष्ट्र बालरक्षक जीवनगौरव पुरस्कार



**नागपूर :** बालरक्षक टीम महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने यावर्षी बालक्षणाच्या क्षेत्रात स्वयंप्रेरणेने ठोस कार्य करणाऱ्या शिक्षकांना 'महाराष्ट्र बालरक्षक जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या उपक्रमात किनो एज्युकेशन सोसायटी बरोबरीने सहकार्य करीत आहे. नागपूर जिल्ह्यात बालकांचे सर्व प्रकारचे संरक्षण तसेच त्यांच्या हक्काची सुरक्षा यासाठी कार्य करणारे बाल रक्षक प्रसेनजित गायकवाड यांचा 'विशेष गौरव' या सोहळ्यात करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रम नाशिक येथे येत्या 11 एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला असून राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांचे हस्ते हा गौरव करण्यात येणार आहे. प्रसेनजित गायकवाड यांनी नागपूर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रातील पुणे, जळगाव, यवतमाळ, भंडारा या जिल्ह्यातही शाळाबाह्य मुलांना शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी कार्य केले आहे. आजपर्यंत त्यांनी जवळपास 1200 पेक्षा जास्त मुलांना शाळेच्या पटावर आणले आहे. ते एकलपालक, अनाथ, निराधार मुलांसाठीही काम करत असून त्यांनी 400 पेक्षा जास्त मुलांना शासनाच्या सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. अन्याय अत्याचार पिडित मुलांच्या व्यवस्थापनासाठी महिला व बालकल्याण विभागाच्या मदतीला ते सदैव तत्पर असतात तसेच बालमजूर व्यवस्थापनासाठी कामगार विभागालाही ते मदत करतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन याआधीही मान्यवर सामाजिक संस्थांनी प्रसेनजित गायकवाड यांचा सन्मान केला आहे. राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या बालरक्षा अभियानांतर्गत प्रसेनजित गायकवाड यांनी जिल्ह्यात बालरक्षा जनजागृती प्रशिक्षण आयोजित करून शिक्षक, पालक, केंद्रप्रमुख यांना बालहक्कांची जाणीव करून दिली आणि केंद्र स्तरावर बालरक्षा पर्यवेक्षण अधिकारी नेमण्याची शिफारस केली आहे. त्यांच्या समन्वय कौशल्याने बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या विविध विभागांचा उत्तम समन्वय साधून जिल्ह्यात बालकांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण होत आहे. प्रसेनजित गायकवाड यांच्या गौरवाने नागपूर जिल्ह्यात बाल रक्षणाच्या क्षेत्रात उत्साह संचारला असून सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. हा माझा सत्कार नसून मुलांसाठी केलेल्या कार्याची समाजाने घेतलेली नोंद आहे. यामुळे अनेकांना कार्य करण्याची ऊर्मी व ऊर्जा प्राप्त व्हावी, अशी नम्र भावना प्रसेनजित गायकवाड यांनी व्यक्त केली आहे. कार्यक्रमाचे आयोजन किनो एज्युकेशन सोसायटी, मालेगाव यांनी केले असून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बालरक्षक टिमचे उमेश आडे, जगदिश खैरनार, गोकुलदास वाघ, नरेंद्र कांबळे आणि विनोद राठोड मेहनत घेत आहेत.

## भारतीय बौद्ध महासभा नगर शाखेच्यावतीने अशोक सम्राट जयंती साजरी



**नागपूर :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया भारतीय बौद्ध महासभेचे मुख्य कार्यालय हरदास नगर कांडप मशीन जवळ उत्तर नागपूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर चरिटेबल ट्रस्ट अंतर्गत भारतीय बौद्ध महासभा उत्तर नागपूर नगर शाखेच्या वतीने अशोक सम्राट जयंती साजरी करण्यात आली, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर चरिटेबल ट्रस्टीचे सचिव भगवानजी कांबळे हे होते, त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे मार्गदर्शक भारतीय बौद्ध महासभा विभागीय अध्यक्ष उत्तर नागपूर धर्मपाल वंजारी, वंचित बहुजन आघाडी महिला अध्यक्ष वर्षा धारगावे, सरोज खोब्रागडे उपाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा नगर शाखा उत्तर नागपूर या सर्वांच्या प्रमुख उपस्थितीत तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच अशोक सम्राट जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून मेणबत्ती दिपप्रज्वलन करण्यात आले, अशोक सम्राट यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनावर प्रमुख मार्गदर्शक यांनी प्रकाश टाकला. प्रास्ताविक पंचशीला सहारे यांनी केले. संचालन रमा सोमकुवर यांनी केले, आभार प्रदर्शन गीता जांभूळकर कोषाध्यक्ष यांनी केले या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत साधना सोमकुवर, माया देशभ्रतार, मीना गजभिये, निरंजना बोरकर, संध्या पाटील, पुष्पा बोरकर, वनमाला कांबळे, इत्यादी मोठ्या संख्येने अशोक सम्राट जयंतीच्या कार्यक्रमात कार्यकर्ते पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते,

## राज्यातील कारागृहांमधील कैद्यांची गर्दी होणार कमी !



**नागपूर :** गृहमंत्रालयाने खुल्या कारागृहात कैद्यांचे स्थानांतरण व्हावे यासाठी निकषांत बदल केले आहेत. या निर्णयामुळे मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांचे स्थानांतर खुल्या कारागृहात होत आहे. पर्यायाने मध्यवर्ती कारागृहातील गर्दीवर नियंत्रण मिळाल्याने प्रशासनावरील भार कमी झाला आहे. राज्यभरातील 60 कारागृहात जवळपास 40 हजारांपेक्षा जास्त कैदी बंदिस्त आहेत. दिवसेंदिवस राज्यभरातील कारागृहात कच्च्या कैद्यांची आणि शिक्षाधीन कैद्यांची संख्या वाढत आहेत. काही जिल्ह्यातील कारागृहात दुपटीपेक्षा जास्त कैदी आहेत. त्यामुळे अनेकदा कारागृहात कैद्यांनी एकमेकांवर हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. कारागृहातील कैदी कमी करण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकार विविध उपक्रम राबवित आहेत. त्यात आर्थिक स्थितीने कमकुवत असलेल्या कैद्यांची जामिनाची रक्कम केंद्र सरकार भरणार असून अशा अनेक कैद्यांना कारागृहाबाहेर काढण्यात येत आहे. तसेच अन्य उपाय म्हणून ज्या कैद्यांची वर्तवणूक सकारात्मक आहे किंवा कैद्याच्या स्वभावात आमुलाग्र बदल झाला आहे, अशा कैद्यांना खुल्या कारागृहात पाठविण्याचा निर्णय कारागृहातील समिती घेते. सध्या राज्यात मोर्शी, पैठण, विसापूर, गडचिरोली आणि येरवडा येथेच खुले कारागृह आहे. या कारागृहांत सध्या 500 ते 700 खुले कैदी आहेत. तसेच नागपूर, अमरावती, अकोला, धुळे, नाशिक, यवतमाळ. पुणे, ठाणे आणि छत्रपती संभाजीनगर शहरात अर्धखुले कारागृह आहेत. मात्र, येथे स्वतंत्र आस्थापना नसल्यामुळे येथील कारभार वाऱ्यावर असल्याची माहिती समोर आली आहे.

स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

नागपूर ताज फर्निचर ॲण्ड रिपेअर





: संपर्क :
मो. 9511632051

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648